# NOTIFICATION

**Urban Development Department,**
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai – 400 032
Date - 23rd July, 2015.

**Maharashtra Municipal Corporations Act,**

No. LBT- 2015/CR-47/UD-32. – The following draft of rules further to amend the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 152T of the Maharashtra Municipal Corporation Act (LIX of 1949); and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (2) of the said section 152T of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 31st July, 2015.

2. Any objection or suggestions which may be received by the Secretary (UD-2) Urban Development Department, Government of Maharashtra, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032, by post or one mail at dsudbudget@yahoo.in or by SMS on mobile No. 9757241085 from any person with respect to the said draft, before the expiry of the above mentioned period will be considered by the Government.

## DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) (Amendment) Rules, 2015.

2. In rule 3 of the Maharashtra Municipal Corporations (local body tax) Rules,2010 (hereinafter referred to as "the Principal Rules') in sub-rule (1) the following shall be added, namely :-

" Provided that for any period starting on or after 1st April 2015, in case of dealer whose turnover of sales or turnover of purchases, during any year, is not less than 50 cr. shall only be liable for registration."

3. In Rule 17 of the Principal Rules in sub-rule (1), after clause (b), before the proviso the following shall be added, namely:-

(c) "neither the turnover of sales nor the turnover of purchases of a registered dealer, during year prior to year starting on 1st April 2015 has exceeded rupees 50 cr. then, the dealer may apply for the cancellation of his certificate of registration, and Commissioner shall, after holding such inquiry as he deem fit cancel the certificate of registration with effect from 1st August 2015 or any other date he may think fit".

**By Order and in name of the Governor Of Maharashtra,**

**G. A. Lokhande,**
Deputy Secretary to Government

# अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दि. २३ जुलै, २०१५.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ४७/२०१५ नवि-३२, - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२ न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० यामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन उक्त कलम १५२ न च्या पोट-कलम (२) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे यामुळे बाधीत होण्याचा संभव असणा-या व्यक्तिंच्या माहितीसाठी खालील अधिसुचनेचा मसुदा प्रसिध्द करीत असून याद्वारे सुचना देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन सदर मसुदा महारष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक ३१ जुलै २०१५ नंतर विचारात घेईल.

२. उक्त मुसदा वरील कालावधी समाप्तीच्या पूर्वी सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२, यांचेकडे पोस्टाने किंवा ई मेल dsudbudget@yahoo.in किंवा SMS मोबाईल क्र. 9757241085 यावर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकती व सुचनांवर शासनाकडून विचार करण्यात येईल.

## अधिसूचनेचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० च्या नियम, ३ मधील उप नियम (१) यामध्ये खालील मजकुर दाखल करण्यात येत आहे.
" ज्या व्यापा-यांची दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये खरेदी अथवा विक्रीची उलाढाल वर्षामध्ये ५० कोटी पेक्षा कमी नसल्यास स्थानिक संस्था करासाठी नोंदणी करणे आवश्यक राहील.

३. नियम १७ मध्ये उपनियम (१) मध्ये, खंड (ख) नंतर, परन्तुकाच्या आधी खालील खंड दाखल करण्यात येत आहे,

(क) " ज्या व्यापाऱ्यांच्या खरेदी किंवा विक्रीची उलाढाल दिनांक १ एप्रिल,२०१५ रोजी सुरू होणा-या आर्थिक वर्षा पूर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये रुपये ५० कोटी पेक्षा कमी असेल असे व्यापारी नोंदणी रद्द करण्याबाबत अर्ज दाखल करु शकतात व आयुक्त, त्यांना आवश्यक वाटेल त्यानुसार सविस्तर तपासणी करुन दि.१ ऑगस्ट,२०१५ पासून अथवा त्यास योग्य वाटेल त्या दिनांकापासून नोंदणी रद्द करतील ".

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

**फोन नं. ०२२-२२८३८८७५**

**तात्काळ/समय मर्यादा**

**क्रमांक**:- स्थासंक२०१५/प्र.क्र.४७/नवि-३२.
**नगर विकास विभाग** हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२
दिनांक: **२३ , जुलै** ,२०१५.

**प्रति,**
**१) आयुक्त,**
सर्व महानगरपालिका,
**२) जिल्हाधिकारी** - ठाणे, पालघर, सोलापूर, कोल्हापूर, जळगाव,
औरंगाबाद, नांदेड, परभणी, लातूर, अहमदनगर,चंद्रपूर, अमरावती, अकोला, सांगली,
पुणे, नाशिक, मालेगाव, धुळे, नागपूर

**विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियमात सुधारणा करण्याबाबतच्या अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत........**

**संदर्भ :- शासन निर्णय क्र. स्थासंक२०१५/प्र.क्र.४७/नवि-३२, दि. २३. जुलै २०१५.**

**महोदय,**

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियमात सुधारणा करण्याबाबतच्या प्रारूप अधिसूचना क्रमांक - स्थासंक२०१५/प्र.क्र.४७/नवि-३२, दि. २३ जुलै २०१५ च्या अधिसूचनेची प्रत शासन निर्णयाच्या प्रतीसह सोबत जोडलेली आहे. सदर अधिसूचनेस व्यापक स्वरूपात प्रसिध्दी द्यावी. दिनांक ३१ जुलै २०१५ पूर्वी सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, हुतात्मा चौक, मादाम काम रोड, मंत्रालय मुंबई यांचेकडे पोस्टाने किंवा ई मेल dsudbudget@yahoo.in किंवा SMS मोबाईल क्र. 9757241085 यावर प्राप्त होणा-या हरकती व सुचनांचा शासनाकडून विचार करण्यात येईल असे आपल्या क्षेत्रातील जनतेस कळवावे त्यासाठी सदर अधिसूचना जास्त खप असलेल्या दोन प्रमुख वृत्त पत्रात प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल दिनाक ३१ जुलै २०१५ पर्यंत शासनास सादर करावा. अशी आपणांस विनंती आहे.

**आपला**

**( सु.उ. राठोड )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**